महाराष्ट्र विधानपरिषद

चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मतदानाचा अधिकार रद्द करण्याबाबत

(१) १८५६ (१८-०३-२०२०). श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मतदानाचा अधिकार रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्या सर्व बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना दिलेल्या मतदानाचा अधिकार अबाधित आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना दिलेल्या मतदानाचा अधिकाराबाबत कोणती भूमिका घेतली वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-११-२०२०) : (१), (२) व (३) राज्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार रद्द करुन दिनांक १३/०६/२०१७ पुर्वीच्या अधिनियमातील तरतूदी लागू करण्यासंदर्भातील महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यासाठी सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ हा दिनांक १४/०३/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्ह्यात शतकोटी वृक्ष लागवडीत गैरव्यवहार झाल्याबाबत

(२) ३६९५ (०२-०६-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक ६९५ ला दिनांक ९ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील शतकोटी वृक्ष लागवडीत सुमारे १०० कोटी रूपयांच्या झालेल्या गैरव्यवहाराची विभागनिहाय व कामनिहाय चौकशी करण्याबाबत सामाजिक कार्यकर्ता यांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून दिनांक १८ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, परभणी यांना कळविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रार अर्जावर सर्वंकष तपासणी पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, अहवालानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुख्य वन संरक्षक प्रादेशिक औरंगाबाद कार्यालयाकडून विभागीय वन अधिकारी (नियोजन) औरंगाबाद यांनी वृक्ष लागवडीची सत्यता तपासण्यासाठी चौकशी करणेबाबत आदेश देण्यात आले होते त्यानुसार विभागीय वन अधिकारी (नियोजन) औरंगाबाद यांनी सदर काम मोठया प्रमाणावर असल्याने ६ तपासणी पथकाची नियुक्ती केली होती, सदर

पथकांनी सन २०१७ च्या पावसाळयात परभणी प्रादेशिक वन विभागाच्या १७ रोपवन स्थळे तसेच सामाजिक वनीकरण विभागाच्या २३ ठिकाणी रस्ता दुतर्फा व २ ठिकाणी गट लागवड असे एकूण २५ कामांची माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तपासणी केली होती, सदर तपासणीच्या अनुषंगाने दोषी आढळलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर दोषारोप पत्र बजावण्यात आलेले होते, त्यानुसार दिनांक २७ जुलै, २०१८ रोजीच्या आदेशान्वये ६ अधिकारी/कर्मचारी यांचेकडून रोपवन नुकसानीच्या अनुषंगाने रक्कम वसूल करण्याचे आदेश पारित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशीनुसार दोषी अधिकारी/कर्मचारी व यंत्रणाविरूध्द कारवाई करुन दिनांक २७ जुलै, २०१८ रोजीच्या आदेशान्वये ६ अधिकारी/कर्मचारी यांचेकडून रोपवन नुकसानीच्या अनुषंगाने रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (११-११-२०२०) : (१) व (२) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे परभणी येथील सामाजिक कार्यकर्ता यांनी दिनांक ०१/०२/२०२० रोजी अशा स्वरुपाची तक्रार केली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून दिनांक १८/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, परभणी यांना कळविण्यात आले होते. तथापि, जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडून याबाबत वेगळ्याने चौकशी करण्यात आलेली नाही. मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांच्याकडून विभागीय वन अधिकारी (नियोजन) औरंगाबाद यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली होती. विभागीय वन अधिकारी (नियोजन) औरंगाबाद यांनी केलेल्या चौकशीस जिल्हाधिकारी, परभणी सहमत आहेत.

(३) हे खरे आहे.

सदर पथकांनी सन २०१७ च्या पावसाळयात परभणी प्रादेशिक वन विभागाच्या १७ रोपवन स्थळांची तपासणी केली होती. त्यानुसार ६ अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून रोपवनात झालेल्या रोपवनाच्या नुकसानीच्या अनुषंगाने रक्कम वसूल करण्याचे आदेश देण्यात आले होते.

तसेच सदर तपासणीच्या अनुषंगाने सामाजिक वनीकरण विभागातील ११ अधिकारी/कर्मचारी यांचेवर सामाजिक वनीकरण विभागामार्फत दोषारोप पत्र बजावण्यात आले होते.

(४) वसूली आदेशानुसार ५ अधिकारी/कर्मचारी यांचेकडून रुपये २,११,३८९/- रक्कम वसूल करण्यात आलेली आहे व उर्वरित एक अधिकारी सेवानिवृत्त झालेले असून नुकसानीची रक्कम तात्काळ भरणा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. परंतू सदर अधिकाऱ्यांनी सदर रक्कम भरणा केलेली नसल्याने सदर रक्कम त्यांना सेवानिवृत्तीनंतर देय असलेल्या लाभातून वसूलीची कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

देशांतर्गत वा विदेशी पर्यटन सहली रद्द केल्याने सहलीचा परतावा देण्याबाबत

(३) ३८६४ (१७-०७-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात टाळेबंदी जाहीर झाल्यामुळे देशांतर्गत व विदेशी पर्यटन सहली दिनांक २५ मार्च, २०२० पासून रद्द करण्यात आल्या असून सहल कंपन्यांनी सहली रद्द केल्यामुळे प्रवाशांना त्यांच्या रकमेचा परतावा देणे बंधनकारक असतानाही अनेक सहल कंपन्यांनी शासकीय आदेशामुळे सहल रद्द कराव्या लागल्याचे कारण पुढे करून प्रवाशांना परतावा देण्याचे नाकारल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही कंपन्यांनी उक्त रकमेचा परतावा देण्याऐवजी क्रेडिट कूपन प्रवाशांना देऊ केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच पर्यटन कंपन्यांना कोणत्या मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.छगन भुजबळ (२७-११-२०२०) : (१), (२), (३) जागतिक महामारी कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर सहली रद्द कराव्या लागल्यामुळे रद्द सहलींच्या परताव्याच्या अनुषंगाने शासनाकडे तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे ग्राहकांच्या तक्रारी प्राप्त आहेत. पर्यटन संचालनालयामार्फत पर्यटन कंपन्यांना याबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या नाहीत.

पर्यटकास / ग्राहकास मूल्य अदा करून घेतलेल्या वस्तू/सेवा यामुळे व्यथित झाल्या असल्यास संबंधित सहल कंपनी/सेवापुरवठादार यांचेविरूध्द ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ अंतर्गत राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे किंवा जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे रितसर तक्रार दाखल करता येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील लाखो शेतकरी कर्ज माफीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

(४) ३९९१ (१७-०७-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विनायकराव मेटे, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्ज माफी योजनेंतर्गत कर्जमाफी यादीत नावे आलेल्या व आधार प्रमाणिकरण होऊन प्रमाणपत्र मिळालेल्या प्रत्येक शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली नसल्यामुळे बँकांमध्ये थकबाकी तशीच दाखवली जात असल्याने शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज वाटप केले गेले नाही किंवा विलंब होत असून कागदपत्रांसाठी अडवणूक केली जात असल्याचे तसेच माहे एप्रिल, २०१५ ते दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंतच्या थकीत पीक कर्जदारांना पीक कर्ज माफीची घोषणा सदर योजनेत समाविष्ट करुनही ११ लाख शेतकरी कर्ज माफीच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक २५ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा जोतिराव फुले कर्ज मुक्ती योजनेत सुमारे ३२ लाख शेतकरी पात्र ठरले असून त्यापैकी केवळ ६० टक्के म्हणजेच १९ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात बारा हजार कोटी रुपये जमा झाले असून सुमारे ११ लाख १२ हजार शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त शेतकऱ्यांचे दोन लाखाचे कर्ज माफ करण्याची घोषणा करुन सहा महिने होऊन देखील १८ लाख शेतकऱ्यांच्या नावाची कर्जमाफीची यादी न काढता दिनांक २२ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाने सदर कर्जमाफीची रक्कम भरू शकत नाही असा आदेश काढून बँकांनी शासनाच्या नावे कर्ज मांडावे असे आदेश काढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खरीपाचे हंगाम असल्याने थकबाकीदार शेतकऱ्यांना लाभ देण्याकरीता शासनाने कर्ज माफीचा लाभ न मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांचे थकीत कर्ज शासनाकडून येणे दाखवून बँकानी नव्याने कर्ज द्यावे असे निर्देश देवूनही संबंधीत व्यापारी, ग्रामीण व सहकारी बँका शेतकऱ्यांना कर्ज देण्यास विलंब करीत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील बँकांना शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी ३२ हजार २६१ कोटींचे मर्यादा शासनाने दिले असून माहे जून, २०२० पर्यंत राज्यातील बँकांनी प्रतिसाद न दिल्याने फक्त ४ हजार ९०० कोटींचे कर्ज वाटप झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना कर्ज देण्यास विलंब करत असलेल्या व्यापारी, ग्रामीण व सहकारी बँकांवर कारवाई करुन पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना महात्मा जोतिराव फुले कर्ज मुक्ती योजनेचा लाभ विनाविलंब देण्याचेदृष्टीने तसेच खरीप हंगामासाठी तातडीने नियोजन करून शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-१२-२०२०) : (१) नाही.

(२) अंशतः खरे आहे.

महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना सन २०१९ या योजनेंतर्गत योजनेचा लाभ मिळणेसाठी ३१.८९ लाख लाभार्थ्यांची यादी निर्गमित केली असून सद्य:स्थितीत ३०.३९ लाख कर्जखात्यांना १९,४५० कोटी रक्कमेचा लाभ देण्यात आला आहे.

(३) व (४) अंशतः खरे आहे.

या योजनेंतर्गत प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये ज्या पात्र खातेदारांची यादीत नावे आहेत मात्र यापैकी ज्यांना योजनेंतर्गत लाभ देण्यात आलेला नाही, अशा पात्र खातेदारांना खरीप, सन २०२० साठी पीक कर्ज देण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २२/०५/२०२० निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णयानुसार महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या यादीतील ज्या पात्र खातेदारांना योजनेचा लाभ मिळाला नाही अशा खातेदारांच्या कर्जखात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा दर्शवून सदर रक्कम शासनाकडून येणे दाखवावी व या खातेदारांना खरीप, सन २०२० साठी पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे.

योजनेंतर्गत निर्गमित केलेल्या यादीमधील ज्या पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला नाही अशा पात्र खातेदारांना नव्याने कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत स्टेट बँक ऑफ इंडिया व अन्य काही बँकांनी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव सादर केल्याचे निदर्शनास आले. तथापि कोविड-१९ मुळे लागू करण्यात आलेले टाळेबंदी शिथील झाल्यानंतर या योजनेंतर्गत पात्र खातेदारांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(५) नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शिवभोजन थाळी योजनेमध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबत

(५) ४००२ (१७-०७-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.निलय नाईक : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिवभोजन योजनेतून जास्तीत जास्त गरजूंना अन्न मिळावे यासाठी कोरोना लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर शिवभोजन थाळ्या वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही केंद्र चालक लॉकडाऊनच्या काळात गैरफायदा घेऊन गरजूंना उपाशी मारून आपला फायदा करुन घेत असल्याचे माहे मे, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काही केंद्रांना दीडशे ते दोनशे थाळ्यांसाठी परवानगी असताना ते प्रत्यक्षात मात्र २५ गरजूंना अन्न दिल्यावर उर्वरित थाळ्यांचे डुप्लीकेट फोटो अपलोड करून त्यांचा पैसा लुबाडत असल्याचा आरोप लोकप्रतिनिधींनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिवभोजन थाळी योजनेमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.छगन भुजबळ (०३-१२-२०२०) : (१) होय.

(२) व (३) सदर कालावधीत अशी कोणतीही घटना निदर्शनास आलेली नाही. तथापि, ग परिमंडळ कार्यालयांतर्गत मालाड (प) विभागातील एका शिवभोजन केंद्रास क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी दिनांक २७/०४/२०२० रोजी भेट दिली असता थाळयाची विक्री संशयास्पद आढळून आल्याने त्यांच्यावर कारवाई करुन सदर केंद्र दिनांक ०४/०५/२०२० रोजी रद्द करण्यात आले आहे. तसेच, ई परिमंडळ कार्यालयांतर्गत २ शिवभोजन केंद्रांनी सन २०२० मध्ये विहित वेळेपूर्वी व विहित वेळेनंतर थाळया वितरित केल्याचे व दुबार फोटो अपलोड केल्याचे आढळल्याने सदर केंद्र चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. सदर केंद्र माहे मे, २०२० पासून तात्पुरत्या स्वरुपात बंद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोकण विभागात रोजगार हमी योजनेंतर्गत विकास कामे सुरु करण्याबाबत

(६) ४३४४ (०९-०९-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विकासाची कामे चांगल्या पध्दतीने सुरु आहेत, परंतु, कोकण विभागात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कोणतीही विकास कामे सुरु झालेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण विभागात रोजगार हमी योजनेंतर्गत कामे सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकण विभागात रोजगार हमी योजनेंतर्गत विकास कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संदीपानराव भुमरे (२७-११-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळांमध्ये पद भरती बंद असल्याबाबत

(७) ४३६९ (१५-०७-२०२०). डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १००२ ला दिनांक ९ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळांमध्ये गत अनेक वर्षापासून पद भरती बंद असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व शारिरीक स्वास्थाची हेळसांड होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आकृतिबंधानुसार सदरील पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धनंजय मुंडे (०२-०९-२०२०) : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

उदगीर, जळकोट, देवणी (जि.लातूर) येथे बनावट रोपवाटिका व निकृष्ट दर्जाची वृक्ष लागवड करून गैरव्यवहार केल्याबाबत

(८) ४३९६ (३१-०७-२०२०). श्री.संजय दौंड : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर, जळकोट व देवणी (जि.लातूर) येथे बनावट रोपवाटिका व निकृष्ट दर्जाची वृक्ष लागवड करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर, विभागीय वन अधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीच चौकशी वा कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने विशेष चौकशी समिती नेमुन उक्त गैरव्यवहाराची चौकशी करून दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (०२-१२-२०२०) : (१) उदगीर, जळकोट, देवणी तालुक्यात वृक्ष लागवडीच्या कामात भ्रष्टाचार झाला असल्याबाबत विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, लातूर यांचेकडे दोन तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) व (३) तक्रारीच्या अनुषंगाने तसेच क्षेत्रिय तपासणी दरम्यान सदरची बाब निदर्शनास आल्याने सहाय्यक वनसंरक्षक व सर्व्हेअर यांच्या पथकामार्फत मौजे निडबन, कोदळी ते चोंडी रस्ता दुतर्फा व उदगीर ते देऊळवाडी रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडीची सखोल चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीअंती क्षेत्रिय कामात अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले. सदर अनियमिततेबाबत वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र उदगीर हे दोषी आढळल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मम्दापूर (ता.येवला, जि.नाशिक) येथील वनतळेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(९) ४३९७ (१४-०९-२०२०). श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मम्दापूर (ता.येवला, जि.नाशिक) वनसंवर्धन राखीव तसेच मनमाड राऊंड व राजापूर राऊंड मधील वनतळेची कामे निकृष्ट दर्जाची करून गैरव्यवहार केला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनतळे मुरूम मिश्रित मातीत बनवली जात असून त्यात कुठल्याही प्रकारच्या काळ्या मातीचा वापर केला जात नाही त्यामुळे जंगली प्राण्यासाठी पुरेश्या प्रमाणात पाणीसाठा होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उन्हाळ्यामध्ये पाण्याच्या शोधामध्ये जंगली प्राणी, हरणे, कळवीट लगतच्या गावात जातात व विहिरीमध्ये पडतात अश्या अनेक बातम्या वृत्तपत्रात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे हजारो काळवीट व हरणांनी जंगलातून स्थलांतर केले असून शासनाचे कोट्यवधी रुपये वाया गेल्याकारणास्तव शासनाने संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (०२-१२-२०२०) : (१) व (२) याबाबत एक तक्रार प्राप्त झाली होती. वनपरिक्षेत्र अधिकारी येवला, प्रादेशिक यांनी तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवालानुसार वनतळे कामांची खोदकाम करताना काळीमाती भरताना, काम चालू असतांना तसेच काम पूर्ण झाल्यावर फोटो कार्यालयात जतन करून ठेवले आहेत. वनतळयांचे काम समाधानकारक असल्याबाबत उप वन अभियंता यांनी अहवाल दिलेला आहे. बहुतांशी वनतळयांमध्ये पाण्याचा भरपूर साठा जमा झालेला असल्याने, त्यामुळे वन्यप्राण्याची पिण्याच्या पाण्याची होणारी भटकंती कमी झाली आहे.

(३) व (४) येवला वनपरिक्षेत्रात मोठया प्रमाणात काळवीट व इतर वन्यप्राणी आहेत, मागील दोन वर्षात ५५ वनबंधारे बांधण्यात आले असून वन्यप्राण्यांना हे बंधारे, कृत्रिम पाणवठे, पाण्याचे टँकर व स्वयंचलित सौरऊर्जा कुंपनलिका यांचे माध्यमातून पाणी पुरवण्याची खबरदारी वन विभागामार्फत घेतली जाते. तरी काही प्रमाणात वन्यप्राणी वन क्षेत्राबाहेर पडतात व तथापि, हे स्थलांतर कायमस्वरूपी नसते.

मागील दोन वर्षात वन्यप्राणी विहिरीत पडण्याच्या १७ घटना घडल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

एचएससी व्होकेशनल अभ्यासक्रमाच्या रुपांतरणाबाबत

(१०) ४४५२ (०९-०९-२०२०). श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.कपिल पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किशोर दराडे : सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एचएससी व्होकेशनल अभ्यासक्रमाची कनिष्ठ महाविद्यालये बंद करुन त्यांचे रुपांतर इतर विभागात करण्याबाबत विचारविनिमय करण्यासाठी शासनाने गठित केलेल्या समितीचे कामकाज पुर्ण झाले आहे काय, समितीने शासनास दिलेल्या अहवालाचे स्वरुप काय आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सादर केलेल्या अहवालानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नवाब मलिक (०२-१२-२०२०) : (१) समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत

(११) ४६२३ (२०-०७-२०२०). श्री.विलास पोतनीस, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३ कोटी ३० लाख जनावरे असून ५००० जनावरांकरीता एक डॉक्टरच्या (पशुधन विकास अधिकारी) नियुक्तीच्या निकषानुसार राज्याला सद्य:स्थितीत ६००० डॉक्टरांची गरज असताना राज्यात पशुधन विकास अधिकाऱ्यांची केवळ २१९२ पदे मंजूर असून त्यापैकी शेकडो पदे रिक्त असल्याचे दिनांक ६ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांच्या भरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २२ डिसेंबर, २०१९ रोजी घेतलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राष्ट्रीय कृषी आयोगाच्या शिफारसीनुसार राज्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत तसेच सदर रिक्त पदांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल त्वरित जाहीर करून पदभरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२६-११-२०२०) : (१) सद्य:स्थितीत, पशुधन विकास अधिकारी या संवर्गाची २१९२ पदे मंजुर असून १६७२ पदे भरलेली आहेत व ५२० पदे रिक्त आहेत.
(२) व (३) पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गाची सरळसेवेने पद भरतीबाबतची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची जाहिरात १३/२०१९ दिनांक २३/०८/२०१९ नुसार चाळणी परीक्षा घेण्यात आली आहे. सरळसेवा भरतीची तद्नुषंगाने पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गाची सरळसेवेने पद भरतीबाबतची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे मृत्यू झाल्याबाबत

(१२) ४८६४ (२०-११-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या १८ कर्मचाऱ्यांचा कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे मृत्यू झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिकेतील कर्मचारी, शिक्षक व सफाई कर्मचारी शहरातील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कार्यरत असतांना वारंवार मागणी करूनही त्यांना प्रतिबंधात्मक साधने उपलब्ध करुन दिली जात नव्हती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाला मृत्यूमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांनी वारंवार पत्र व्यवहार करूनही कोणत्याही स्वरुपाची आर्थिक मदत मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच मृत्यूमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनाची पूर्तताही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०८-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

(२) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी, महानगरपालिकेतील कर्मचारी, शिक्षक व सफाई कर्मचारी, कर्तव्यावर कार्यरत असताना, त्यांना पीपीई किट, सॅनिटायझर, मास्क व ग्लोव्हज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(३), (४) व (५) आतापर्यंत मृत कर्मचाऱ्यांच्या १२ वारसदारांनी सादर केलेल्या दस्तऐवजानुसार, संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचेकडे आर्थिक मदतीसाठी सादर प्रस्तावातील ०५ प्रस्ताव संचालनालयाने अपात्र ठरविले असून, ०७ प्रस्ताव निर्णयासाठी प्रस्तावित आहेत. तर, ०६ मृतक कर्मचाऱ्यांच्या वारसदारांकडून आवश्यकत्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्याची कार्यवाही महानगरपालिकास्तरावर सुरु आहे.

शासन निर्णय दिनांक २१/०९/२०१७ अन्वये, “केवळ सेवेत असताना दिवंगत झालेल्या गट “क” व “ड” च्या कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांनाच अनुकंपा नियुक्ती देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

यामध्ये कोविडमुळे मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांसाठी वेगळी तरतूद दिलेली नाही.

तद्नुसार, यापूर्वी महापालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत असलेल्या व सेवेत असताना मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांची एकूण ४२ वारसदारांची प्रतिक्षा यादी असून, त्यापैकी २३ पात्र वारसदारांची नियुक्ती प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

कोविडमुळे मृत कर्मचाऱ्यांच्या वारसदारांच्या अनुकंपाचे प्रस्ताव महापालिकेस प्राप्त झालेले असून, या प्रकरणी नियमानुसार, प्रतिक्षा यादीतील क्रमानुसार व रिक्त पदाच्या उपलब्धतेनुसार अनुकंपा नियुक्तीची कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आल्याचे, महापालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

नागपूर शहरात बनावट दस्ताऐवज बनविणाऱ्या रॅकेटवर कारवाई करण्याबाबत

(१३) ४९१७ (११-११-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निर्माण करण्यात आलेल्या अनेक ठिकाणच्या जिल्हा सेतु केंद्रात बनावट दस्ताऐवज बनविणारे रॅकेट सक्रीय असून, जात व उत्पन्नाचे प्रमाणपत्रावर बोगस सहया करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडे तक्रारी करुनही याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त ठिकाणी नोकरीसाठी बनावट क्रीडा प्रमाणपत्रही मिळत असल्याचे निदर्शनास आले असून असे रॅकेट राज्याच्या इतर भागातही सुरु असल्याचे निदर्शनात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर येथे बनावट दस्ताऐवज बनविणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०२-१२-२०२०) : (१), (२), (३) व (४) तहसिल कार्यालय, नागपूर शहर येथे नागरिकांना व विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्र सुलभरित्या निर्गमित करण्याकरिता जिल्हा सेतु केंद्र व तहसिल सेतु केंद्र येथे मार्गदर्शन व मदत कक्ष कार्यरत आहे. त्याव्दारे विविध प्रमाणपत्राकरिता आवश्यक कागदपत्राची माहिती व अर्ज सादर करण्याची माहिती उपलब्ध करुन देण्यात येत असते. यासंदर्भात, नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी मध्यस्थ व्यक्ती यांचेकडून कोणतीही कामे करुन घेऊ नये याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

मात्र काही अर्जदारांची उत्पन्न प्रमाणपत्रे नायब तहसिलदार यांच्या डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आली नसल्याने सदर प्रमाणपत्रे बोगस असल्याचे नायब तहसिलदार, नागपूर शहर यांच्या निदर्शनास आले. तसेच तहसिलदार, नागपूर शहर यांचेकडे श्री.मोहम्मद मजीहुल्लाह खान यांना निर्गमित करण्यात आलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र बोगस असल्याची तक्रार प्राप्त झाली. यासंदर्भात, सदर प्रकरणी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्याकरिता नायब तहसिलदार, नागपूर शहर यांना अधिकृत करण्यात येऊन, पोलीस स्टेशन सदर नागपूर शहर येथे श्री.संतोष जैसवाल व इतर यांचेविरुध्द भा.दं.सं. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. सदर फिर्यादीबाबत पोलीस तपास चालू आहे.

नोकरीसाठी बनावट क्रीडा प्रमाणपत्र मिळत असल्याची बाब औरंगाबाद व नागपूर विभागात निदर्शनास आली असून संबंधितांविरुध्द फौजदारी कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत जागतिक दर्जाचे भव्य मल्टीलेव्हल मत्स्यालय उभारण्याबाबत

(१४) ४९६९ (१८-११-२०२०). श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये बँकॉक येथील सिम ओशन वर्ल्डच्या धर्तीवर जागतिक दर्जाचे भव्य मल्टीलेव्हल मत्स्यालय उभे करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावावर निर्णय घेऊन मुंबईत जागतिक दर्जाचे भव्य मल्टीलेव्हल मत्स्यालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अस्लम शेख (०७-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

रोहा (जि.रायगड) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना पुर्ववत सुरु करण्याबाबत

(१५) ४९७६ (१८-११-२०२०). श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील पश्चिम खोऱ्यात १० वर्षापूर्वी कार्यान्वित झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेमार्फत केवळ १ वर्ष संबंधित गावांना पाणीपुरवठा सुरळीत झाला असून काही कालावधीतच योजना प्रलंबित

राहिल्याने गत ९ वर्षे भातसई ते धोंडखार विभागातील भातसई, लक्ष्मीनगर, झोलांबे, शेणवई, डोंगरी, वावे, वावे पोटगे, सानेगाव, यशवंतखार, धोडखार ही १० गावे पाण्यापासून वंचित आहेत, परिणामत: पाणीपुरवठा योजनेसाठी खर्च करण्यात आलेले कोटयवधी रूपये, निकृष्ट दर्जाचे काम, अयोग्य नियोजन, योजनेतील गैरव्यवहार आदी सर्व कारणांमुळे उक्त योजना असफल झाली असल्यामुळे सदरहू १० गावातील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ९ वर्षे भातसई ते धोंडखार विभागातील २६ गावांना पाणी मिळत नसल्याने ही गावे पाण्यापासून वंचित राहिल्यामुळे तेथील ग्रामस्थांनी यासंबंधी मा.मुख्यमंत्री, मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, मा.पालकमंत्री, रायगड जिल्हा, जिल्हाधिकारी, रायगड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे गत ८ वर्षापासून अनेकवेळा लेखी निवेदन देवून संबंधित अधिकाऱ्यांसमवेत २ वेळा बैठका घेऊन शासनाचे लक्ष वेधूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावांतील पाण्याची समस्या तात्काळ दूर करण्यात यावी, अन्यथा आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा ग्रामस्थांनी लेखी निवेदनाव्दारे जिल्हाधिकारी, रायगड यांना माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवडयात दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक मा.लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पुन्हा एक सविस्तर निवेदन वजा पत्र पाठविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीच्या अनुषंगाने उक्त २६ गावांना विनाविलंब कायमस्वरूपी सुरळीत पाणीपुरवठा सुरु करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करुन पाणीपुरवठा योजनेच्या गैरकारभारास जबाबदार असलेल्या संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव पाटील (०७-१२-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.

सदर योजना जून, २०१४ मध्ये कार्यान्वित झाल्यानंतर योजनेतून डिसेंबर, २०१७ पर्यंत पडम ते धोंडखार पर्यंत नियमित स्वरुपात पाणीपुरवठा सुरु होता. तद्नंतर मुख्य गुरुत्व व वितरण वाहिन्यावर घेण्यात आलेल्या अनधिकृत नळजोडण्या तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून होणारा अपुरा पाणीपुरवठा या कारणांमुळे झोलांबेच्या पुढील गावांना योजनेतून पाणीपुरवठा होत नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेच्या संकल्पनानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १२ तासात २.२३ द.ल.ली. पाणी उपलब्ध करुन देणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात २४ तासात ०.९० ते १.१० द.ल.ली. इतकाच पाणीपुरवठा केला जात आहे. त्यानुसार एक दिवस डावा तीर व दोन दिवस उजवा तीर याप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येतो.

योजनेतून समाविष्ट गावांना पाणीपुरवठा होण्याकरीता धाटाव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा उंच जलकुंभ ते दमखाडी जलमीटर पर्यंत ३५० मिमी व्यासाची एक्सप्रेस फीडर जलवाहिनी टाकण्याचे प्रस्तावित आहे. सदरच्या कामास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने रुपये ५२८.२५ लक्ष इतक्या किंमतीस काही अटींच्या अधिन राहून मान्यता दिली. सदर अटींच्या पुर्ततेबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास अवगत करण्यात आले आहे. सदरचे काम व देखभाल दुरुस्तीची अंदाजित किंमत रुपये ६०७.०० लक्ष इतकी होत असून सदर रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्राप्त होताच सदर कामे हाती घेण्यात येतील. सदर कामे पूर्ण झाल्यानंतर योजनेतून सुरळीतपणे पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी, रायगड यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १२/१०/२०२० रोजीच्या पत्राची प्रत मा.मुख्यमंत्री महोदय तसेच मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांना पाठविलेली आहे.

(५) योजनेतील मुख्य गुरुत्व व वितरण वाहिन्यावर घेण्यात आलेल्या अनधिकृत नळजोडण्या खंडीत करण्याची कार्यवाही माहे जानेवारी, २०१८ ते माहे एप्रिल, २०१८, माहे जानेवारी, २०१९ ते माहे फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत आणि दिनांक २१/०३/२०२० रोजी करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून रुपये ६०७.०० लक्ष इतका निधी प्राप्त होण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

राज्यात शेतकरी सन्मान व मार्गदर्शक केंद्र सुरु करण्याबाबत

(१६) ५००१ (१८-११-२०२०). श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथे सुरु करण्यात आलेल्या शेतकरी सन्मान व मार्गदर्शक कक्षाच्या धर्तीवर राज्यात सुमारे ५०० केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदरहू प्रस्तावावर कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रस्तावावर निर्णय घेऊन राज्यात शेतकरी सन्मान व मार्गदर्शक केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दादाजी भुसे (०२-१२-२०२०) : (१) कृषी विभागाच्या सर्व कार्यालयामध्ये तालुका/जिल्हा/विभाग पातळीवरील कार्यालयात शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष स्थापन करण्यात आले आहे.

(२) शासनाच्या कृषी व पदुम विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०/२अे, दिनांक २२/०१/२०२० अन्वये शासनाच्या विविध यंत्रणांकडून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये समन्वय साधून त्याचे सनियंत्रण करण्यासाठी तालुकास्तरावर शेतकरी समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याबरोबर कृषी विभागाच्या सर्व कार्यालयामध्ये तालुका/जिल्हा/विभाग पातळीवरील कार्यालयात शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष स्थापन करण्यात आले आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २२/१०/२०२० अनुसार कारवाई केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना रुपये ५० लाखाचे सानुग्रह सहाय्य देण्याबाबत

(१७) ५०२३ (१८-११-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणूच्या काळात पोलीस अधिकारी व कर्मचारी सातत्याने कार्यरत असून दिनांक २५ सप्टेंबर, २०२० रोजीपर्यंत एकूण २२ हजार २६० पोलिसांना कोरोना संसर्गाची लागण झाली असून कोरोना संसर्गामुळे बाधित झालेल्या पोलिसांपैकी २३९ पोलिसांचा कोरोनामुळे मृत्यू झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनामुळे पोलीस अधिकारी/कर्मचारी मृत्यूमुखी पडल्यास रुपये ५० लाखांचे सानुग्रह सहाय्य म्हणून त्यांच्या कुटुंबियांना देण्याचे दिनांक २९ मे, २०२० रोजी शासनाने जाहीर केले असून सदरहू अनुदानासाठी सर्वच पोलीस पात्र नसून ज्यांनी कोरोना प्रतिबंधक कर्तव्य केले असेल त्यांनाच सानुग्रह सहाय्य म्हणून मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वास्तविक पोलिसांना पोलीस ठाण्यात, बंदोबस्तात, वाहतूक नियंत्रण किंवा अन्य कामात अनेक अनोळखी लोकांना भेटावे लागते, त्यांना हाताळावे लागते, त्यामुळे त्यांना आजार झाल्यास तो शासकीय कर्तव्य पार पाडतानाच झालेली दुर्घटना ठरते, तरीही कोरोना प्रतिबंधक कर्तव्यासाठी कर्तव्य केले असेल तरच अनुदानास पात्र ठरविणे असमर्थनीयच असल्याची भावना पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी व्यक्त केली असून कोरोनामुळे मरण पावलेल्या सर्वच पोलीस अधिकारी व कर्मचारी विशेष सानुग्रह (रुपये ५० लक्ष) पात्र असावेत व यात टाकलेल्या अटी शासनाने मागे घ्यावेत अशी प्रतिक्रिया निवृत्त पोलीस महासंचालक एम.एन.सिंह यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोरोना प्रतिबंधक कर्तव्य केले असेल त्यांनाच सानुग्रह सहाय्य म्हणून मिळणार असल्याची अट व शर्त शिथिल करुन राज्यातील सर्वच कर्तव्यावर असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना रुपये ५० लाखाचे सानुग्रह सहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (०८-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २९/०५/२०२० मधील नमूद विवक्षित अटी व शर्तीच्या अधीन राहून कर्तव्य पार पाडत असताना “COVID-१९” या सांसर्गिक रोगाची लागण झाल्यामुळे मृत पावलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना रुपये ५०,००,०००/- (रुपये पन्नास लक्ष फक्त) इतके सानुग्रह सहाय्य प्रदान करण्यात येते. उक्त शासन निर्णयातील संबध्द अटी पुढीलप्रमाणे आहेत :-

I. संबंधित कर्मचारी हा “COVID-१९” च्या सार्वत्रिक साथीच्या अनुषंगाने कोविड (COVID) विषयक कर्तव्यावरील (सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार, मदत कार्य इत्यादी) यांसंबंधी असला पाहिजे.

II. संबंधित कर्मचारी हा रुग्णालयात दाखल होण्याच्या अथवा मृत्यूच्या तारखेपूर्वी १४ दिवसांच्या काळात कर्तव्यावर हजर होता, असे संबंधित पदनिर्देशित विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र.

III. संबंधित कर्मचारी याचा मृत्यू हा "COVID-१९" शी संबंधित आहे असा सरकारी, महानगरपालिका किंवा "I.C.M.R." प्राधिकृत खाजगी रुग्णालय/ प्रयोगशाळा यांचा अहवाल.

माहे नोव्हेंबर, २०२० अखेरपर्यंत कर्तव्य पार पाडत असताना "COVID-१९" या सांसर्गिक रोगाची लागण झाल्यामुळे मृत पावलेल्या एकूण २३६ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना रुपये ५०,००,०००/- (रुपये पन्नास लक्ष फक्त) इतके सानुग्रह सहाय्य प्रदान करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जालना जिल्ह्यात अवैधरित्या मुरुम व दगडाचे उत्खनन करणाऱ्या कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत

(१८) ५०८६ (१८-११-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात समृध्दी महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने जिल्ह्यातील विविध गावांतून अवैधरित्या मुरुम व दगडाचे उत्खनन केल्याबद्दल संबंधित कंपनीविरुध्द तहसिलदार, जालना यांनी रुपये २४२ कोटी दंडाची रक्कम भरण्याबाबतची नोटीस सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान जारी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैधरित्या मुरुम व दगडाचे उत्खनन केल्याप्रकरणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीने आकारण्यात आलेली दंडाची रक्कम रुपये २४२ कोटी विहित मुदतीत शासनाकडे जमा केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरित्या मुरुम व दगडाचे उत्खनन करणाऱ्या दोषी कंपनीवर कारवाई करुन त्यांचेकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१) तहसिलदार, जालना यांनी जालना तालुक्यामध्ये मे.मॉन्टी कार्लो लि. व आयर्न ट्रँगल लि. या कंपनीला अवैध मुरुम उत्खनन प्रकरणी रुपये ८७.२० कोटी एवढ्या दंडात्मक रक्कमेचे आदेश दिनांक ०६/१०/२०२० रोजी पारीत केले आहेत.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) अपर जिल्हाधिकारी, जालना व तहसिलदार, जालना यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना सदर कंपनीकडून शास्तीची रक्कम वसुल केल्याशिवाय सदर कंपनीचे देयक अदा करु नये असे कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपळगाव काजळे (ता.जिंतूर, जि.परभणी) येथे अवैधरित्या गौण खनिज उत्खनन होत असल्याबाबत

(१९) ५०९० (१८-११-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळगाव काजळे (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील मे.महालक्ष्मी स्टोन क्रशर यांनी अवैधरित्या गौण खनिज उत्खनन केल्याप्रकरणी तहसिलदार, जिंतूर यांनी संबंधितास रुपये ५ कोटी ३५ लक्षाची दंडाची नोटीस सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान जारी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांनी दंडाची रक्कम विहित मुदतीत शासनाकडे जमा केली आहे काय, याबाबतची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध गौण खनिज उत्खननापोटी दोषींवर कारवाई करुन आकारण्यात आलेली दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१), (२) व (३) उपविभागीय अधिकारी, सेलू यांनी मे.महालक्ष्मी स्टोन क्रशर यांना दिनांक १७/०७/२०२० रोजी रुपये ५,३५,१०,७२०/- एवढी दंडाची नोटीस बजावण्यात आली. सदर प्रकरणात उपविभागीय अधिकारी, सेलू यांनी परवानगीपेक्षा जादाचे ४५४.०५ ब्रास अवैध गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे नमूद करुन दिनांक ०७/०९/२०२० रोजी रुपये २६,४६,७००/- दंडाचे आदेश पारीत केले आहेत.

सदर दंडात्मक रक्कमेच्या आदेशाच्या अनुषंगाने मे.महालक्ष्मी स्टोन क्रशर यांनी दिनांक १९/०९/२०२० रोजी दंडात्मक रक्कम शासन खाती जमा केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गंगाखेड (जि.परभणी) तालुक्यात लॉकडाऊन कालावधीत आयोजित सोहळ्यात सामाजिक अंतरचे पालन केले नसल्याबाबत

(२०) ५१०६ (२०-११-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड (जि.परभणी) येथे एका व्यापाऱ्याने आयोजित केलेल्या सोहळ्यात परवानगी नसतांनाही वरिष्ठ अधिकारी, व्यापारी व इतर उपस्थित राहिल्याने याप्रकरणी चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी तीन उप जिल्हाधिकाऱ्यांची समिती स्थापन केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी संबंधितास रुपये ५ लक्ष दंड ठोठावला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यक्रमास उपस्थित असलेले लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी व इतरांनी सामाजिक अंतर व इतर नियमांचा भंग केल्याप्रकरणी त्यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी व्यापाऱ्याकडून दंडाची रक्कम वसूल करुन त्यांच्यावर गुन्हा नोंदविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार (०७-१२-२०२०) : (१) अंशत: खरे आहे. तीन सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.
(२) होय.
(३) नाही.
(४) दंडा पैकी रुपये २,५०,०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे व आयोजकाविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी येथे विभागीय आयुक्त कार्यालय स्थापन करणेबाबत

(२१) ५१६४ (१८-११-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक ४४९९५ ला दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यासाठी दुसरे महसूल आयुक्तालय परभणी येथे स्थापन करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी यापूर्वीच शासनाकडे केली असून दुसऱ्या आयुक्तालयाची जागा निश्चित करण्याबाबत मराठवाड्यातील सर्व लोकप्रतिनिधींची बैठक घेवून अंतिम निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन तत्कालीन महसूल मंत्री यांनी विधानपरिषदेतील तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अंतिम कार्यवाही करण्यात आली आहे काय, त्याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परभणी येथे विभागीय आयुक्त कार्यालय स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१) होय.
(२), (३) व (४) औरंगाबाद महसूल विभागाचे विभाजन करुन परभणी येथे नवीन आयुक्तालय स्थापन करण्याच्या मागणी शिवाय नांदेड व लातूर येथे नवीन आयुक्तालय करणेबाबत ही मागणी यापुर्वी करण्यात आली आहे. तथापि, सदर बाब धोरणात्मक असल्यामुळे या संदर्भात यथावकाश सर्व संबंधितांशी विचारविनिमय करुन उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

हिवरखेडा (जि.अमरावती) येथील एलईडी पथदिव्यांच्या खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

(२२) ५२०१ (१४-११-२०२०). श्री.रामनिवास सिंह, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिवरखेडा (जि.अमरावती) येथील एलईडी पथदिव्यांच्या खरेदीत गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (०७-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) पंचायत समिती, मोर्शी जि.प. अमरावती अंतर्गत हिवरखेडा हया नावाचे गांव अस्तिवात नसुन हिवरखेड या नावाचे गांव अस्तित्वात आहे. सदर ग्रा.प. मध्ये चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतून खरेदी करण्यात आलेल्या एल.ई.डी. पथदिव्यांच्या खरेदीत गैरव्यवहार झाल्या प्रकरणाची तक्रार पंचायत समिती मोर्शी वा जि.प. अमरावती या कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे चौकशी या स्तरावरुन करण्यात आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भीमाशंकर अभयारण्यातील साकरमाची (जि.पुणे) गावातील ग्रामस्थांचे पुनर्वसन करण्याबाबत

(२३) ५२१२ (१३-११-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील माळीण गावात दुर्घटना घडल्यानंतर भीमाशंकर अभयारण्यातील साकरमाची गावातील ग्रामस्थांना मौजे लांबाचीवाडी (ता. मुरबाड) येथे तात्पुरत्या पत्राच्या शेडमध्ये स्थलांतरित करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्थलांतराला सात वर्षे होत आली असूनही सदर ग्रामस्थांचे पुनर्वसन झाले नसल्याने रहिवाश्यांना वन्यप्राणी, साप, विंचवांच्या सानिध्यात रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामस्थांची पुनर्वसनाची जबाबदारी पुणे जिल्हा प्रशासनाची असल्याने तसा प्रस्ताव मुरबाडचे वनक्षेत्रपाल यांनी मंजुरीसाठी पाठवला असून शासनाकडे सदर प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ग्रामस्थांचे पुनर्वसन करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (०८-१२-२०२०) : (१) मौजे साखरमाची येथील संकलित यादीतील ४६ कुटुंबांपैकी २२ कुटुंबांचे सर्वे क्रमांक ३८ या खाजगी मालकीच्या क्षेत्रावर तात्पुरत्या स्वरुपात तर ४ कुटुंबांचे मौजे लांबाचीवाडी (मुरबाड), ता.मुरबाड येथे राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मौजे साखरमाची येथील पुनर्वसन करण्यात आलेल्या कुटुंबियांना तात्पुरत्या निवाऱ्याची सोय व इतर तातडीच्या मुलभूत सोयी सुविधा रुपये ४३,८२,९७४/- इतका निधी खर्च करुन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(४) व (५) मौजे साखरमाची येथील संकलित यादीतील ४६ कुटुंबांनी पुनर्वसनाकरीता निवडलेले क्षेत्र हे राखीव व संरक्षित वन असून सदर क्षेत्राचा वनेत्तर वापर करण्याकरीता वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत वळतीकरण करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर क्षेत्राचा वळतीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनास ऑनलाईन सादर करण्यात आला असून त्यानुषंगाने केंद्र शासनामार्फत मान्यती प्राप्त होणे अपेक्षित आहे.

उमरखेड (जि.यवतमाळ) येथे उमेद प्रकल्पांतर्गत महिला बचत गटांची व शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक झाल्याबाबत

(२४) ५२३५ (१८-११-२०२०). डॉ.वजाहत मिर्झा : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथे महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत उमेद या प्रकल्पात महिला बचत गटांना दोनशे रुपयांचे किटकनाशके बाराशे रुपयाला विकून गटविकास अधिकाऱ्यांनी महिला बचत गटांची तसेच शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार उमेद प्रकल्पांतर्गत महिला बचत गटांची व शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या उमेद प्रकल्पाच्या गटविकास अधिकारी व तालुका समन्वयक यांच्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (०८-१२-२०२०) : (१) व (२) या प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यामुळे जिल्हास्तरावरुन चौकशी समिती नेमण्यात आली आहे. चौकशी समितीमार्फत चौकशी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्थेच्या तलाव ठेक्याची रक्कम माफ करण्याबाबत

(२५) ५२६० (१८-११-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्थानी तलावात सोडलेल्या माशांची कोरोना लॉकडाऊन काळात मासेमारी करता आली नाही तसेच तलावातील माशांची रखवालीसुध्दा करता आली नाही त्यामुळे तलावात गरम पाणी येऊन तलावातील मच्छी मृत्यूमुखी पडून मच्छिमार संस्थचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिनांक ९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मच्छिमार संस्थेचे आर्थिक नुकसान झाल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्थांच्या सन २०२०-२०२१ या वर्षाच्या तलावाच्या ठेक्याची रक्कम माफ करण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्यांनी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्थेच्या तलाव ठेक्याची रक्कम माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अस्लम शेख (०७-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.

कोरोना लाकडाऊन काळात मच्छिमारांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी दिनांक १५ एप्रिल २०२० पासून कोविड-१९ संसर्गजन्य रोगाचे प्रतिबंधात्मक राष्ट्रीय निर्देशांची अंमलबजावणी करून चंद्रपूर जिल्ह्यातील बाजारपेठेत सकाळी ७.०० ते दुपारी २.०० या कालावधीत मत्स्यव्यावसायिकांनी तलावातून मासळी पकडणे व बाजारपेठेत मासोळी विक्री करण्यास जिल्हा प्रशासनाकडून परवानगी देण्यात आलेली होती.
(२) हे खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद तलावांचे ठेके ज्या मच्छिमार सहकारी संस्थांकडे आहेत अशा तलावाच्या ठेक्याची रक्कम माफ करण्याची मागणी चंद्रपूर जिल्हा परिषद सदस्यांनी निवेदनाव्दारे केली आहे.
(३) मच्छिमार संस्थाचे कोरोना लाकडाऊनमुळे नुकसान होवू नये याकरिता जिल्हा परिषद चंद्रपूर तर्फे दिनांक २६/०६/२०२० रोजीच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या ठरावाव्दारे जिल्हा परिषद तलावांचे ठेके ज्या मच्छिमार सहकारी संस्थेकडे आहेत अशा संस्थांना तलाव ठेक्यास नि:शुल्क मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

जलसंपदा विभागाच्या मालकीच्या ज्या तलावांचे मासेमारी हक्क मत्स्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत अशा तलावांची सन २०२०-२०२१ या वर्षाची ठेका रक्कम व बोटुकली संचयनाची १० टक्के आगाऊ रक्कम भरणा करण्यासाठी दिनांक ३१/१२/२०२० अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वैजापूर (जि.औरंगाबाद) येथे समृध्दी महामार्गाच्या कामात कंत्राटदाराने अवैधरित्या मुरुम उत्खनन केल्याबाबत

(२६) ५२७४ (१८-११-२०२०). श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृध्दी महामार्गाच्या पॅकेज दहाचे काम वैजापूर (जि.औरंगाबाद) येथे सुरु असून कंत्राटदार एल ॲण्ड टी कंपनींचा नालेगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत खडी प्रकल्प तसेच करंजगाव येथे मिक्सींग प्लांट असल्याने कंत्राटदार कंपनी नियमबाह्य पध्दतीने पाझर तलावातून मातीचा उपसा करीत असल्यामुळे प्रकल्पाचे नुकसान होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैजापूर तालुक्यातील समृध्दी महामार्गाच्या कामात कंत्राटदाराने अवैधरित्या मुरुम उत्खनन केल्याप्रकरणी दोषी कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

औरंगाबाद जिल्ह्यात महोगनी वृक्षांची वाढीव दराने विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(२७) ५२९० (१८-११-२०२०). श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१८ मध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमार्फत वैयक्तिक लाभार्थींच्या शेताच्या बांधावर आणि शेतात सामाजिक वनीकरण विभागांतर्गत ३१ प्रजातीच्या झाडांची निवड शासनाने केली असून

सदरहू झाडांपैकी रुपये ४०/- किंमतीच्या महोगनी वृक्षांच्या रोपांची विक्री औरंगाबाद जिल्ह्यात काही एजंटकडून रुपये १०५/- एवढ्या वाढीव दरात केली जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वृक्षांची वाढीव दरात विक्री करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संदीपानराव भुमरे (०८-१२-२०२०) : (१) नाही, हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

निवासी डॉक्टरांचे शैक्षणिक शुल्क व बँकेचे कर्ज माफ करण्याबाबत

(२८) ५३३८ (१७-११-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विरोधात काम करणाऱ्या निवासी डॉक्टरांचे शैक्षणिक शुल्क व बँकेचे कर्ज काढून शैक्षणिक फी भरणाऱ्यांचे कर्ज माफ करावे अशी मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने निवासी डॉक्टरांचे शैक्षणिक शुल्क व बँकेचे कर्ज माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (०४-१२-२०२०) : (१) निवासी डॉक्टरांना शैक्षणिक शुल्कातून सूट मिळावी याकरिता सेंट्रल मार्ड संघटनेकडून मागणी करण्यात आली होती.

(२) निवासी डॉक्टरांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आलेले नाही. तथापि, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात दिनांक ०१ मे, २०२० पासून प्रतिमहा रुपये १०,०००/- ठोक वाढ लागू करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने निवासी डॉक्टरांना रुपये ६४,०००/- ते रुपये ७१,०००/- इतके विद्यावेतन दरमहा अदा करण्यात येत आहे. निवासी डॉक्टरांना प्रतिवर्ष साधारणत: रुपये ७८,५००/- ते ९४,४००/- इतके शैक्षणिक शुल्क प्रतिवर्ष (पदवी अभ्यासक्रमासाठी ३ वर्ष किंवा पदविका अभ्यासक्रमासाठी २ वर्ष) भरावे लागत आहे. निवासी डॉक्टरांना शैक्षणिक शुल्क रक्कमेच्या तुलनेत चांगल्या दराने विद्यावेतन शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याव्यतिरिक्त, पदव्युत्तर शिक्षणाच्या कालावधीत वसतिगृह सुविधा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यातील आंतरवासियांचे (इंटर्न) विद्यावेतन प्रलंबित असल्याबाबत

(२९) ५३४० (१७-११-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत कोरोना दक्षता केंद्रामध्ये सेवा देणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासियांचे (इंटर्न) विद्यावेतन गत ३ महिन्यापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने आंतरवासियांचे प्रलंबित असलेले विद्यावेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (०४-१२-२०२०) : (१) नाही, हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वरळी डेअरीच्या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन संकुल उभारण्याबाबत

(३०) ५३८९ (१८-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वरळी येथील शासकीय दूध योजनेच्या १४ एकर जागेवर एक हजार कोटी रुपये खर्चून आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पर्यटन संकुलाचे स्वरुप काय आहे, यासाठी लागणारा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे व यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, वरळी डेअरीच्या १४ एकर जागेवर उपरोक्त पर्यटन संकुल उभारण्यात येणार असल्यामुळे डेअरीसाठी कोणती पर्यायी व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील वरळी डेअरीच्या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन संकुल उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.आदित्य ठाकरे (०७-१२-२०२०) : (१), (२) व (३) वरळी डेअरीच्या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन संकुलाची निर्मिती करण्याचे प्रस्तावित असून याबाबत सर्व संबंधित विभागांशी विचारविनिमय करुन कार्यवाही करण्यात येईल.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

अर्धापूर (जि.नांदेड) येथे हिंस्त्र प्राण्यांच्या हल्ल्यात पशुधनाचे नुकसान होत असल्याबाबत

(३१) ५४१७ (१३-११-२०२०). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर, (जि.नांदेड) तालुक्यात हिंस्त्र प्राण्यांच्या हल्ल्यात शेतकऱ्यांच्या पशुधनाचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्धापूर तालुक्यातील वन परिमंडळातील लहान, पाटपूर, चेनापूर, पिंपळकोठा शिवाऱ्यातील काही भागात बिबटयाने दहशत पसरविली असुन मागील काही महिन्यांमध्ये शेतातील पशुंना बिबटयाने खाल्ले असल्याने सदर ठिकाणी हिंस्त्र प्राण्यांची दहशत निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (०८-१२-२०२०) : (१) व (२) अर्धापूर तालुक्यातील लहान या गावात माहे सप्टेंबर, २०२० मध्ये १ पशुधनाचा व ऑक्टोबर, २०२० मध्ये २ पशुधनाचा वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याच्या घटना निदर्शनास आले आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित पशुधनाच्या मालकास आर्थिक नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुखेड (जि.नांदेड) येथील अंगणवाडी कार्यालयाच्या इमारतीचे रंगकाम व फरशीचे काम पूर्ण करण्याबाबत

(३२) ५४१८ (१४-११-२०२०). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) येथे पंचायत समिती कार्यालयाच्या परिसरात सन २०१२ मध्ये मंजूर झालेली एकात्मिक बालविकास प्रकल्प योजनेंतर्गत अंगणवाडी कार्यालयासाठी मंजूर झालेल्या भव्य इमारतीचे बांधकाम पूर्ण होत आले असून केवळ रंगकाम व फरशी यासारखी किरकोळ कामे गत सहा ते सात वर्षापासून प्रलंबित असल्याने संबंधित प्रशासनास या इमारतीचा ताबा मिळत नसल्याने उक्त इमारतीत गैरप्रकार होत असल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित इमारतीच्या शेजारी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक महिला बालविकास यांचे कार्यालय असून या कार्यालयात तालुक्यातील अंगणवाडी व बालवाडीच्या पर्यवेक्षिका, कार्यकर्ती व मदतनीस यासारख्या महिला मोठया प्रमाणात येत असल्याने इमारतीत समाजकंटकांचा वावर असल्याने महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीसाठी सन २०१२ मध्ये मंजूर झालेल्या रुपये ४५ लाख निधीपैकी रुपये ३७ लाख निधी संबंधित ठेकेदारास देण्यात आले असून उर्वरित रुपये ८ लाख एवढा निधी अप्राप्त असल्याने सदरहू रंगकाम व फरशीचे काम अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू कामे तातडीने पूर्ण करुन अंगणवाडी कार्यालयाच्या इमारतीचा ताबा संबंधित प्रशासनाला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (०८-१२-२०२०) : (१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयाच्या परिसरात सन २०१२ मध्ये मंजूर झालेली इमारत एकात्मिक बालविकास प्रकल्प योजनेंतर्गतची इमारत नसून सदर इमारत महिला बचत गटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीकरिता बांधण्यात आलेल्या तालुका विक्री केंद्राची इमारत आहे. सदर इमारतीचे काम अपूर्ण आहे. मात्र, या इमारतीमध्ये गैरप्रकार होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नसून सदरची इमारत कुलूपबंद आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

मुखेड (जि.नांदेड) येथील तालुका विक्री केंद्रासाठी शासनाकडून रुपये २५.०० लक्ष उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच बांधकामावर होणारा वाढीव खर्च स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेखालील मुलभूत सुविधांसाठी असलेल्या निधीतून जास्तीत जास्त रुपये २०.०० लक्षाच्या मर्यादेत राहून करण्यास शासनाने मान्यता दिली होती. त्यानुसार या कामास मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., नांदेड यांनी रुपये ४५.०० लक्ष रकमेची प्रशासकीय मान्यता दिली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांच्याकडे संपूर्ण निधी उपलब्ध झाला होता. तथापि, ठेकेदाराने विहित वेळेत काम पूर्ण केले नाही. सदर कामावर खर्च झालेली रक्कम रुपये ३७.४१ लक्ष ठेकेदारास अदा करण्यात आली आहे. दरम्यान, सदर कार्यालयाकडून या कामाचा उर्वरित निधी रुपये ७.५८ लक्ष महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यालयाकडे परत केला. ठेकेदारने विहित वेळेत काम पूर्ण न केल्याने निधी उपलब्ध करून देऊनही काम अपूर्ण राहिले व निधी परत केला गेला. तर शासनाने थेट उपलब्ध केलेला निधी खर्च करण्यात आला आहे.

(४) व (५) शासनस्तरावरुन उपलब्ध करुन दिलेल्या निधीपैकी क्षेत्रियस्तरावर अखर्चित राहिलेल्या निधीतून पूर्ण झालेल्या तालुका विक्री केंद्रांसाठी सोयी सुविधा निर्माण करणे तसेच अपूर्ण कामे पूर्ण करणे यासाठी निधी खर्च करण्यास मान्यता देण्याची विनंती नियोजन व वित्त विभागाकडे केली असता या विभागांनी सदर अखर्चित निधी शासनास जमा करण्यात यावा असे निदेश दिलेले आहेत. त्यानुसार सध्या या प्रकरणी क्षेत्रियस्तरावरील तालुका विक्री केंद्रांचा अखर्चित निधी जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर अखर्चित निधी जमा झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्रीवर्धन (जि.रायगड) येथे दिघी कोळी समाज व दिघी पोर्ट यांच्यामध्ये झालेल्या कराराची अंमलबजावणी करण्याबाबत

(३३) ५४४६ (१८-११-२०२०). श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील दिघी पोर्ट प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या मच्छिमार कोळी बांधवांना रोजगारासाठी दिघी पोर्टमध्ये नोकरी मिळणे, पिण्याच्या पाण्यासाठी प्रतिदिन १०० पाण्याचे टँकर उपलब्ध करणे, कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी प्रति महिना ठराविक रक्कम देणे, छोटे-मोठे ठेकेदारीचे काम मिळणे, आधुनिक दवाखाना व प्रशस्त खेळाचे मैदान उपलब्ध करून देणे, मासे साठविण्यासाठी शीतगृहे आणि जेटीचे नव्याने बांधकाम करुन देणे अशा प्रकारच्या अनेक सुविधांचा करार दिघी पोर्टने केला असून माहे एप्रिल, २०२० च्या शेवटच्या सप्ताहपर्यंत सदर कराराची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दिघी पोर्टकडे विचारणा केली असता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व स्थानिक पोलीस ठाण्यातून मच्छिमार बांधवांवर दबाव आणला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील दिघी बंदर प्रकल्पामध्ये कोळी समाज व दिघी पोर्ट प्राधिकरण यांच्यामध्ये झालेल्या कराराची अंमलबजावणी करुन मच्छिमार बांधवांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अस्लम शेख (०८-१२-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत दिघी बंदर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या मच्छिमार कोळी बांधवांपैकी काही बेरोजगार तरुणांना मे.दिघी पोर्ट लि. मार्फत रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ४२/२००९ प्रकरणी दिलेल्या आदेशानुसार, स्थानिक भागामध्ये प्रतिदिनी १०० पाण्याचे टँकर उपलब्ध करुन देण्याकामी दिघी पोर्ट लि. व त्यांच्यामार्फत नियुक्त यंत्रणेकडून कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यातील आदिवासींच्या जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण थांबविण्याबाबत

(३४) ५४६९ (१८-११-२०२०). श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक ८१२ ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना हस्तांतरीत करण्यास बंदी असतानाही आदिवासी जमिनीचे बेकायदेशीर व्यवहार होत असल्याने शासनाने बीड जिल्ह्यामध्ये आदिवासींच्या जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ वर "आदिवासी जमीन हस्तांतरणास बंदी/निर्बंध" अशा आशयाचे शेरे मारण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आष्टी (जि.बीड) येथील आदिवासींच्या जमिनींचे बेकायदेशीर व्यवहार झाल्याचे एकूण १० प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यात आढळून आलेल्या १० प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६ व ३६-अ नुसार अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, तसेच संपूर्ण बीड जिल्ह्यात अशा प्रकरणाचा शोध घेऊन त्यावर कार्यवाही करण्याबाबत जिल्ह्यातील सर्व तहसिलदार यांना सूचना देण्यात येवूनही तसेच, आदिवासींच्या जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ वर हस्तांतरणास निर्बंध असल्याचे शेरे मारण्याबाबत सर्व तहसिलदारांना दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात येवूनही त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासींच्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण थांबवण्यासाठी बीड जिल्ह्यातील आदिवासीच्या जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ वर "आदिवासी जमीन हस्तांतरणास बंदी/निर्बंध" अशा आशयाचे शेरे मारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०८-१२-२०२०) : (१), (२), (३), (४) व (५) बीड जिल्हयामध्ये आदिवासींच्या जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ वर "आदिवासी जमीन हस्तांतरणास बंदी/निर्बंध" अशा आशयाचे शेरे मारण्यात आले नसल्याचे सन २०१९ मध्ये निदर्शनास आले. त्यानुसार सदर शेरे मारण्याबाबत दिनांक १३/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये बीड जिल्ह्यातील सर्व तहसिलदारांना सूचना देण्यात आल्या. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामध्ये अशी १० प्रकरणे आढळून आली होती. तसेच, नव्याने तीन प्रकरणे आढळून आली आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व ३६ अ अन्वये या सर्व १३ प्रकरणांच्या गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्क सदरी "हस्तांतरणास निर्बंध" असे शेरे मारण्यात आले आहेत.

दिघोरी (ता.लाखांदूर, जि.भंडारा) येथील चुलबंद नदीच्या तिरावरुन रेतीची अवैध वाहतूक होत असल्याबाबत

(३५) ५५१५ (१८-११-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिघोरी (ता.लाखांदूर, जि.भंडारा) येथील चुलबंद नदीच्या तिरावरुन दररोज शेकडो ब्रास रेतीची अवैध वाहतूक रोजरोसपणे सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैधरित्या रेतीचे उत्खनन करुन वाहतूक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) लोकप्रतिनिधींनी अशा आशयाचे निवेदन शासनास दिले होते. त्यानुषंगाने शासन पत्र दिनांक ०२/११/२०२० अन्वये विभागीय आयुक्त नागपूर यांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांनी जिल्हाधिकारी, भंडारा यांना उचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

भंडारा जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा तसेच तालुकास्तरावर पथके स्थापन करण्यात आली आहे. सदर पथकाव्दारे भंडारा जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२० ते माहे नोव्हेंबर, २०२० या कालावधीत १४० प्रकरणांत रुपये २,६५,८०,२३४/- एवढा दंड वसुल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील गोशाळांचे अनुदान सुरु करण्याबाबत

(३६) ५५२० (११-११-२०२०). श्री.रामदास कदम : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गोशाळांचे अनुदान शासनाने बंद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोशाळांचे अनुदान बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोशाळांचे अनुदान सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुनिल केदार (०९-१२-२०२०) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) "राज्यस्तरीय गोवर्धन गोवंश सेवा केंद्र" या योजनेंतर्गत दिनांक ३१/०३/२०१८ व दिनांक ०४/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये ३४ संस्थांची निवड करण्यात आली आहे. सदर ३४ संस्थांपैकी दोन संस्थांनी अनुदान नाकारल्यामुळे उर्वरित ३२ संस्थांसोबत करारनामा करण्यात आलेला आहे. शासन निर्णयातील तरतुदीनुसार संस्थाना चार हप्त्यात अनुदान वाटप करावयाचे असून कार्यपूर्ततेनुसार उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अनुदानाचा पुढील हप्ता अनुज्ञेय आहे. त्यानुसार ३२ संस्थाना अनुदानाचा पहिला हप्ता, ३० संस्थांना अनुदानाचा दुसरा हप्ता, २२ संस्थांना तिसरा हप्ता व ०५ संस्थांना अनुदानाचा चौथा हप्ता याप्रमाणे अनुदान वितरित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वडशिवणे (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील लघुपाटबंधारे तलावात उजनी जलाशयातील पुराचे अतिरिक्त पाणी सोडण्याबाबत

(३७) ५५९६ (२३-११-२०२०). श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी उजनी लाभक्षेत्रातील प्रश्नासंबंधी बैठक होऊन वडशिवणे (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील लघुपाटबंधारे तलावात दहिगाव उपसा सिंचन योजनेतून उजनी जलाशयातील पुराचे अतिरिक्त पाणी सोडण्याच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर यांना सविस्तर सर्व्हेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वडशिवणे येथील लघुपाटबंधारे तलावात उजनी जलाशयातील पुराचे अतिरीक्त पाणी सोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (०७-१२-२०२०) : (१) होय.
(२) वडशिवणे लघुपाटबंधारे तलावात दहिगाव उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामाचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. तथापि, सदर काम हे मुळ प्रकल्पाच्या व्याप्तीबाहेरचे आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

रेवस (ता.अलिबाग, जि.रायगड) बंदरातील जेट्टी वाढविण्याबाबत

(३८) ५६३७ (१८-११-२०२०). श्री.जयंत पाटील : सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील करंजा बंदरातून प्रवाशांना घेऊन रेवसकडे निघालेली स्वप्नपूर्ती बोट दिनांक १९ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास समुद्रातील गाळात रुतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून दरवर्षी रेवस-करंजा खाडीतील गाळ काढण्यासाठी कोट्यवधी रुपयांचे काम केले जात असतानाही समुद्राच्या ओहोटीच्या वेळी गाळात बोटी रुतण्याच्या घटना वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुन्हा-पुन्हा गाळ साचत असल्यामुळे रेवस बंदरातील गाळ काढून सदर प्रवाशी जेट्टी समुद्रात पुढे वाढविण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रेवस बंदरातील गाळ काढून प्रवाशी जेट्टी समुद्रात पुढे वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अस्लम शेख (०८-१२-२०२०) : (१) व (२) होय, परंतू समुद्राच्या ओहोटीच्या वेळी गाळात बोटी रुतण्याच्या घटना वारंवार घडत आहेत, हे खरे नाही.

(३) व (४) केंद्र शासनाच्या सागरमाला योजनेंतर्गत रेवस (ता.अलिबाग, जि. रायगड) येथे रोरो जेट्टी बांधणेच्या कामास मंजूरी आहे. सद्य:स्थितीत रोरो जेट्टीचे काम प्रगतीपथावर आहे. सदरची रोरो जेट्टी ही अस्तित्वातील जेट्टीपेक्षा समुद्राच्या दिशेने ७० मी. लांबी वाढवून बांधकाम करण्यात येणार आहे. या जेट्टीवरुन रोरो तसेच प्रवासी वाहतूक होणार आहे. तसेच या कामामध्ये गाळ काढण्याची बाब देखील अंतर्भूत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

करंजा (ता.उरण, जि.रायगड) येथील नौदलाच्या सुरक्षा पट्ट्यासाठी आरक्षित केलेल्या जागेचे आरक्षण रद्द करण्याबाबत

(३९) ५६५० (१८-११-२०२०). श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजा (ता.उरण, जि.रायगड) नौदलाच्या सुरक्षा पट्ट्यासाठी आरक्षित जागेची मोजणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांनी तहसिलदार, उरण यांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने दिनांक १६ मे, १९९२ मध्ये जाहीर केलेल्या अध्यादेशानुसार उरण शहरातील काही भाग तसेच उरण येथील बोरी पाखाडी, केगाव, म्हातवली व उरण बाजारपेठ येथील पाच हजारांपेक्षा अधिक कुटुंबे बाधित होणार असून एकूण २७१ हेक्टरमध्ये मोडणारी शेती व बिनशेती जमीन उरण करंजा येथील नौदलाच्या शस्त्रगारासाठी व सुरक्षा पट्ट्यासाठी आरक्षण केली असून या परिसरात ५ हजारांपेक्षा अधिक घरे व बांधकामे येत असल्याने यामध्ये ३५ हजार नागरीक बाधित होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आरक्षण रद्द करण्यात यावे यासाठी शासनाकडून संरक्षण मंत्रालयाशी पत्रव्यवहार सुरु असताना पुन्हा या परिसराच्या सर्वेक्षणाच्या सूचना देण्यात आल्याने उरणकरांवर पुन्हा एकदा सुरक्षा पट्ट्याचे सावट आले असून उरणकरांच्या घरांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उरण येथील बाधित नागरीकांच्या न्याय हक्कासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) मौजे म्हातवली, मौजे बोरीपाखाडी व मौजे केगाव (ता.उरण जि.रायगड) येथील एकूण २७०-९३.९९ हे.आर जमिनी नेव्हल आर्ममेंट डेपो (NAD) करंजा, ता.उरण करिता दि इंडियन वर्क्स ऑफ डिफेन्स ॲक्ट १९०३ मधील कलम ३(१) प्रमाणे सुरक्षा पट्टा म्हणून दिनांक १६/०५/१९९२ च्या अधिसूचनेव्दारे अधिसूचित करण्यात आल्या आहेत. दि इंडियन वर्क्स ऑफ डिफेन्स ॲक्ट १९०३ मधील कलम ७ (ब) नुसार सदर क्षेत्रामध्ये बांधकामावर निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर अधिसूचना रद्द करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड तसेच नगर विकास विभागाकडून केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शिक्षण अधिकाऱ्यासह इतर रिक्त पदे भरण्याबाबत

(४०) ५६८८ (१८-११-२०२०). श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शिक्षण अधिकारी या पदासह विविध ४८ पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (०७-१२-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे. रिक्त पदांवर अन्य अधिकाऱ्यांना अतिरीक्त कार्यभार देऊन शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाढवण (जि.पालघर) बंदर उभारणीचे कामास स्थगिती देण्याबाबत

(४१) ५७४३ (२०-११-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाढवण (ता.डहाणू, जि.पालघर) बंदराला शेकडो गावांसह स्थानिक भूमिपूत्र, शेतकरी, मच्छिमार, आदिवासींचा तीव्र विरोध असून या ठिकाणी बंदर नकोच अशी ठाम भूमिका नागरिकांची असतांना केंद्र शासनाने खाजगीकरणातून रुपये ६५ हजार कोटी खर्च करुन वाढवण बंदर उभारणीच्या पूर्वनियोजित कामाचे आदेश एका विदेशी कंपनीला दिल्यामुळे सर्वस्तरातून या कृतीचा निषेध व संताप व्यक्त होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंदर उभारणीमुळे अनेक गावे उद्ध्वस्त होवून अनेकांचे स्वयंरोजगार हिरावले जाणार असून मासेमारीसाठी गोल्डन बेल्ट असलेले मासेमारीचे क्षेत्र नष्ट होणार असल्याने मच्छिमारही उद्ध्वस्त होणार असून उक्त ठिकाणी शेतकऱ्यांच्या जमिनी या प्रकल्पासाठी हिरावून घेतल्याने सधन शेतकरीही भूमीहीन होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढवण बंदर उभारणीचे कामास स्थगिती देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच, स्थानिक भूमिपूत्र, शेतकरी, मच्छिमार व आदिवासी यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाढवण बंदर उभारणीचे कामास स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अस्लम शेख (०७-१२-२०२०) : (१), (२), (३), (४) व (५) जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांच्याकडून केंद्र शासनास सादर करण्यात आलेल्या रुपये ६५००० कोटी खर्चाच्या वाढवण बंदर विकास प्रकल्पास मिनिस्ट्री ऑफ शिपिंग यांचेकडून तत्वत: मान्यता दिलेली आहे. तथापि, हया कामाचे आदेश विदेशी कंपनीला केंद्र शासनाने दिलेले नाहीत.

स्वयंरोजगार व मासेमारी क्षेत्राच्या संदर्भात पर्यावरणाचा अभ्यास करुन केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाकडून मान्यता घेण्याचा अभ्यास प्रस्तावित बंदराच्या आराखडयात जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांचेकडून सुरु आहे.

केंद्र शासनाच्या राजपत्रात नोंदणीव्दारे प्रस्तावित वाढवण बंदर हे मोठे बंदर (Major Port) म्हणून विकसित होणार असल्याने हा प्रकल्प केंद्र शासनाचे अखत्यारीत आहे. प्रकल्प आराखडा, डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण (DTEPA) यांचे निर्णय व अहवालांमधील निष्कर्षांचा अभ्यास करुन बंदर प्रकल्पाबाबत योग्य त्या सहमतीअंती निर्णय केंद्र शासनामार्फत घेण्यात येईल. तथापि, जिल्हयात या प्रकल्पास निषेध व विरोध होत आहे, हे खरे आहे.

राज्यात कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा व इतर सुविधा लागू करण्याबाबत

(४२) ५८०८ (१८-११-२०२०). श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तलाठी यांचे मदतनीस म्हणून काम पाहणारे कोतवाल हे शासकीय सेवक म्हणून काम पाहत असून गत ५० ते ६० वर्षापासून त्यांना शासकीय तसेच चतुर्थश्रेणी दर्जा प्राप्ता व्हावा याकरीता आंदोलन, मोर्चे व निवेदनेच्या माध्यमातून शासनाकडे पाठपुरावा करण्यात आले असून

राज्यातील कोतवालांना चतुर्थश्रेणीमध्ये समाविष्ट करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेने गडचिरोली येथे शासनास माहे सप्टेंबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिशय तुटपुंज्या पगारात कोतवाल आपली सेवा बजावत असून मंत्रिमंडळाच्या बैठकीतील शिफारशींनुसार दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयाप्रमाणे कोतवालांना अटल पेन्शन योजना, शासकीय कर्मचारी अपघात विमा योजना तसेच महात्मा ज्योतिबा फुले योजना यापैकी कोणत्याही योजनांचा लाभ गत दोन वर्षापासून लागू झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोतवालांना चतुर्थश्रेणीचा दर्जा व इतर सुविधा लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१) होय.

(२), (३) व (४) राज्यातील मानधनावरील कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याकरीता राज्य शासनाने "एकछत्र योजना" तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या शिफारशी लक्षात घेवून, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.५८१/ई-१०, दिनांक ०६/०२/२०१९ अन्वये सेवा कालावधी ० ते १० पर्यंत रुपये ७५००/-, सेवा कालावधी ११ ते २० वर्ष ३% वाढीनुसार रुपये ७७२५/-, सेवा कालावधी २१ ते ३० वर्ष ४ % वाढीनुसार रुपये ७८००/- सेवा कालावधी ३१ ते वर्षावरील ५% वाढीनुसार रुपये ७८७५/- व ५० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या प्रत्येक कोतवालास दरमहा रुपये १५०००/- इतके मानधन लागू करण्यात आले आहे.

अपघात विमा योजनेखाली राशीभूत विमा रक्कमेवर आकारण्यात येणारी वार्षिक वर्गणी तसेच "अटल निवृत्तीवेतन योजना" व "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" या योजनांचे हप्ते शासनाकडून भरण्यात येणार असल्याने त्याकरीता सदर योजनांच्या हप्त्याकरीता लागणाऱ्या निधीचा जिल्हानिहाय तपशील प्राप्त झाल्यानंतर, त्याप्रमाणे वित्त विभागाच्या सहमतीने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

"कोतवाल" हे पद मानधनावरील आहे. सबब, कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा देण्याबाबत संघटनेची मागणी अमान्य करण्यात आलेली आहे.

मौजे गाजीपूर (ता.जि.अकोला) येथे अवैध गौण खनिज उत्खनन करण्यात आल्याबाबत

(४३) ५८११ (१८-११-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गाजीपूर (ता.जि.अकोला) येथील स.नं. २७ मध्ये बिगर आदिवासी नोंदणीकृत जमीन भाडेपट्ट्याने ९९ वर्षाचा करार श्री.संतोष लुणकरण चांडक यांनी श्री.चिमोटे यांच्याकडून नोंदणीकृत भाडेपट्ट्या कराराने करुन घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स.नं. २७ मध्ये मोठ्या प्रमाणात अवैध गौण खनिज चोरी केली असल्याने श्री.चांडक यांच्या मालकीचे 'साई स्टोन क्रशर' या कंपनीवर शासनाने दिनांक १४ जून, २०१७ नुसार पाच पट दंड वसूल करणे अपेक्षित असतांना महसूल प्रशासनाने आदिवासी जमीनधारक श्री.विलास कालू चिमोटे यांच्यावर दंड आकारल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणात नोंदणीकृत भाडेपट्ट्याने श्री.चांडक यांनीच अवैध उत्खनन केल्याची बाब समोर आल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा प्रशासनाकडे रितसर तक्रार करुन आदिवासी जमीनधारक श्री.विलास कालू चिमोटे यांच्यावर दंडाची आकारणी अवैध असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली असून सदर दंडाची आकारणी श्री.संतोष लुणकरण चांडक यांच्याकडून वसूल करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा प्रशासनाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीबाबत कोणतीही कार्यवाही केली नसून जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी श्री.संतोष लुणकरण चांडक यांचेशी आर्थिक संगनमत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करुन आर्थिक संगनमत करणाऱ्या दोषी संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) तत्कालीन तहसिलदार अकोट यांनी दिनांक १०/०९/२०२० रोजी आदिवासी जमीनधारक श्री.विलास कालू चिमोटे यांचे नावे दंडात्मक आदेश पारीत केले आहे.
(३), (४) व (५) तहसिलदार अकोट यांनी दिनांक १०/०९/२०२० रोजीच्या आदेशान्वये श्री.विलास कालू चिमोटे यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचे दिसून आले. तथापि, सदर प्रकरणात स्टोन क्रशर परवानगी श्री.संतोष चांडक यांचे नावे असून ते स्टोन क्रशर चालवीत असल्याचे निदर्शनास आल्याने तहसिलदार अकोट यांनी दिनांक १०/०९/२०२० रोजीच्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्याबाबत संबंधित पक्षकार यांना नोटीस काढण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

पातूर (जि.अकोला) येथे अवैधरित्या मुरुम व गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(४४) ५८४२ (१८-११-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातूर (जि.अकोला) येथील अकोला-वाशिम या मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम मौंन्टें कार्ला ही कंपनी करीत असून या कंपनीने मुरुमाचे ५ हजार ब्रास अवैध उत्खनन केल्याची तक्रार या भागातील नागरिकांनी जिल्हाधिकारी, अकोला व तहसिलदार, पातूर यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पातूर (जि.अकोला) तालुक्यातील शिर्ला फाट्याजवळ रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम सुरु असतांना कंत्राटदाराने शासनास रॉयल्टी न भरता अवैधरित्या खोदकाम करुन गौण खनिज उत्खनन व वाहतूक करीत असल्याबाबतची तक्रार स्थानिक नागरिकांनी तहसिलदार, पातूर यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैधरित्या मुरुम, गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्या कंपनी व कंत्राटदारावर शासन निर्णयानुसार पाच पट दंड आकारुन दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत महसूल विभागाने प्रस्तावित केले आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पातूर तालुक्यात अवैधरित्या मुरुम, गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करुन दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) स्थानिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, पातूर यांनी संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांचेकडून अहवाल मागविला. तसेच संबंधित कंपनीकडून अवैध उत्खननाबाबत स्पष्टीकरण मागविले होते. त्यांचेकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बाळापूर यांचेकडून तांत्रिक अहवाल मागविण्यात आला आहे.

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बाळापूर यांच्याकडून मोजमापाबाबत दिनांक २७/११/२०२० रोजी अहवाल प्राप्त झाला असून त्यावर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अभियंता यांचा अहवाल घेवून नियमानुसार जिल्हाधिकारी अकोला यांचेकडून कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोलखेड (ता.अकोट, जि.अकोला) येथील नदीपात्रातून होणारी अवैध रेती उत्खनन रोखण्याबाबत

(४५) ५८४४ (१८-११-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोलखेड (ता.अकोट, जि.अकोला) येथील नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात बद्री रेतीचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याची तक्रार नागरिकांनी जिल्हा प्रशासनाकडे व तहसिल प्रशासनाकडे वारंवार करण्यात येवूनही अवैध रेतीचे उत्खनन करणारे, या भागातील सर्कल व तलाठी यांच्यात आर्थिक संगनमत असल्यामुळे अवैध रेती उत्खननावर कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध उत्खनन करुन शासनाचा महसूल बुडविणाऱ्या रेती माफिया व त्यांना सहकार्य करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अवैध रेती उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामस्थांना पिण्याचे शुध्द पाणी मिळण्याबाबत

(४६) ५९२१ (२०-११-२०२०). श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील मजगाव, उसरोली, नांदगाव व विहूर या चार ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ग्रामस्थांना विहूर धरणातून गत काही महिन्यांपासून पिवळसर प्रदुषित पाण्याचा पुरवठा होत असल्यामुळे तेथील ग्रामस्थांना पाणीटंचाईच्या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पिवळसर प्रदूषित पाण्याच्या होत असलेल्या पुरवठयाबाबत तेथील ग्रामपंचायतींनी सातत्याने संबंधित अधिकाऱ्याकडे लेखी तक्रार करूनही त्याकडे दिरंगाई व दुर्लक्ष होत असल्यामुळे सुमारे २५,००० हून अधिक ग्रामस्थांना दुषित पाणी पिण्याची वेळ आल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रदूषित पाणी पुरवठयाबाबत ग्रामपंचायतीने अध्यक्षा, जिल्हा परिषद रायगड यांच्याकडे एक सविस्तर निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू ग्रामस्थांना पिण्याचे शुध्द पाणी मिळण्याच्यादृष्टीने कार्यवाही करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव पाटील (०७-१२-२०२०) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) दुर्गंधीयुक्त पाणी पुरवठ्याबाबत तक्रार प्राप्त होताच धरणामधील पाणी पुरवठयाच्या चरातील (Trench) व जलवाहिनी वरील गाळ व पालापाचोळा साफ केला आहे. त्यामुळे पाण्याची दुर्गंधी कमी झाली आहे.

तसेच खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित गावातील नागरिकांना पाणी उकळून व गाळून पिण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे जिल्हा नियोजन कार्यक्रमांतर्गत जलशुध्दीकरणासाठी प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या पुलांची व रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

(४७) ६०६२ (२०-११-२०२०). श्री.रमेश कराड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यामध्ये माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील १२२४१ किमी लांबीच्या रस्त्यांचे नुकसान झाले असून अनेक रस्त्यांवरील पूल वाहून गेले आहेत तसेच काही भागातील पूल खचून नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील २५४ पेक्षा अधिक पुलांची तातडीने दुरुस्ती करणे गरजेचे असल्यामुळे स्थानिक जिल्हा प्रशासनाने ४२ कोटी रुपयांच्या निधीची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार लातूर जिल्ह्यास निधी देवून पुलांची व रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (०३-१२-२०२०) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

अतिवृष्टीमुळे लातूर जिल्हामध्ये एकूण १७८७.१७ किमी लांबीपैकी ८५.१५ किमी लांबीच्या रस्त्याचे व ८९ लहान व मोठ्या पूलांची हानी झाली आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे. विशेष पूरहानी दुरुस्ती कार्यक्रम २०२०-२०२१ अंतर्गत मुख्य अभियंता, औरंगाबाद यांचे कार्यालयाकडून पूरहानी दुरुस्तीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. त्यानुषंगाने सदर रस्ते दुरुस्तीचे काम निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे जळगांव (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील नळ पाणीपुरवठा योजनेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

(४८) ६११२ (२०-११-२०२०). श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जळगांव (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने सन २०१६ मध्ये सदरहू योजनेस मंजुरी दिली होती, तसेच सदरहू योजनेच्या निकषानुसार ग्रामस्थांचा लोक सहभाग म्हणून रुपये ४,२९,०००/- इतकी लोकवर्गणी ग्रामस्थांकडून गोळा करण्यात येवून ती बँकेच्या बचत खात्यात भरणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या दिनांक ९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार "लोकवर्गणीची रक्कम बचत खात्यातून काढता येणार नाही" असे निर्बंध असताना तत्कालीन अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, जळगांव यांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ व दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी सुमारे ४,५०,०००/- इतकी रक्कम नियमबाहयरित्या काढून शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रक्कम नियमबाहयरित्या बँक बचत खात्यातून काढल्यामुळे बँक बचत खात्याच्या नियमानुसार ३.२५ टक्के व्याजदराने मिळणाऱ्या रुपये ३९,५५०/- इतक्या रकमेचे नुकसान झाल्यामुळे सदरहू रक्कम तत्कालीन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेकडे भरणा करावी अशी नोटीस कोरेगाव पंचायत समितीने माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान ग्रामपंचायतीस पाठविली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पेयजल योजनेत आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव पाटील (०७-१२-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौजे जळगांव (ता.कोरेगाव, जि.सातारा) नळ पाणीपुरवठा योजनेला दिनांक २७/०५/२०१४ रोजीच्या ग्रामसभा ठरावान्वये मंजूरी देण्यात आली आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्याक्रमांतर्गत योजनेची लोकवर्गणी रक्कम रुपये ४,२९,०००/- व व्याजाची रक्कम रुपये २१,०००/- अशी एकूण रुपये ४,५०,०००/- इतकी रक्कम शासन निर्णय दिनांक ०९/०७/२०१४ नुसार लोकवर्गणी माफ करण्यात आली आहे अशा समजूतीने काढण्यात आली होती. परंतु, सदर काढलेली रुपये ४,५०,०००/- इतकी रक्कम दिनांक २०/०६/२०१९ अखेर तत्कालीन अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांनी ग्रामपंचायत, जळगांव यांचेकडे जमा केली आहे. तद्नंतर, दिनांक २७/०९/२०१६ पासून आजपर्यंत रकमेवरील रुपये ३९,५५०/- इतके देय होणारे व्याजाची रक्कम तत्कालीन अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांनी ग्रामपंचायत, जळगाव यांचेकडे दिनांक २३/११/२०२० रोजी जमा केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बारसू (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील जमिनीची बेकायदेशीररित्या खरेदी विक्री झाल्याबाबत

(४९) ६१२६ (२०-११-२०२०). श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारसू (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील प्रस्तावित औद्योगिक वसाहती संदर्भात शासनाने बंद केलेल्या ७/१२ जमिनीची खरेदी विक्री करता येत नसतानाही काही जमीन दलालांनी महसूल प्रशासनाच्या संगनमताने उक्त ७/१२ जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार केल्याचे अनेक प्रकार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारसू येथील प्रस्तावित लघु औद्योगिक वसाहतीच्या अंतर्गत गोवळे येथील बंद ७/१२ जमिनींची खरेदी विक्रीची अनेक प्रकरणे बेकायदेशीररित्या झाल्याप्रकरणी स्थानिक नागरीकांनी लेखी निवदेनाव्दारे मा.महसूल राज्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजी प्रांताधिकारी, राजापूर यांना संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन त्याचा अहवाल पंधरा दिवसात पाठविण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.महसूल राज्यमंत्री यांनी प्रांताधिकारी, राजापूर यांना दिलेल्या आदेशानुसार प्रांताधिकारी, राजापूर यांचा याप्रकरणीचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, सदर अहवालाची थोडक्यात माहिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंद केलेल्या ७/१२ जमिनीची बेकायदेशीर खरेदी विक्री करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२०) : (१) होय.

(२) याबाबत स्थानिक नागरिकांनी लेखी निवेदन दिलेले नाही, परंतु पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर मा.राज्यमंत्री महसूल यांनी तोंडी सूचना दिल्या होत्या.

(३), (४) व (५) याबाबत उपविभागीय अधिकारी, राजापूर यांनी चौकशी केली असता ३ खरेदी खते झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने एम.आय.डी.सी. बारसू क्षेत्रामध्ये असे आणखी व्यवहार झाले आहेत का, याबाबत उपविभागीय अधिकारी, राजापूर यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

(५०) ६२६५ (२०-११-२०२०). डॉ.रणजित पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करावा या मागणीसाठी कोकण कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून आंदोलन केले असून सातवा वेतन आयोग लागू न केल्यास लेखणी बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कृषी विद्यापीठे वगळून अन्य शैक्षणिक विद्यापीठांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आल्याने कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनाही सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत चारही कृषी विद्यापीठांकडून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील चारही कृषी विद्यापीठांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दादाजी भुसे (०७-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत वित्त विभागाने सहमती दर्शविलेली आहे. तरी, राज्यातील कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाकडे अभिप्रायार्थ प्रस्ताव फेरसादर करण्यात आला आहे.

कृषी विद्यापीठातील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याबाबत वित्त विभागाकडून कळविण्यात आले आहे त्यानुषंगाने सदरील प्रस्ताव विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायार्थ सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

श्री.राजेंद्र भागवत
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.